## —: प्रेस नोट:— 

दिनांक १४/११/२०२१

## महीलेचा खून करून फरार झालेल्या आरोपीतास अटक

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—५, कुर्ला (प.), मुंबई ७०. |
| २ | गु.नो.क्र. व कलम | पंतनगर पोलीस ठाणे, गु.र.क्र.६७७/२१, कलम ३०२ भादवि |
| ३ | घटनास्थळ | बिल्डींग नं ३८ व ३९ मधील मोकळी जागा, भाजीमार्केट चौक, पंतनगर , घाटकोपर, मुंबई. |
| ४ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि. २/११/२०२१ रोजी १६:०५ वा. चे पुर्वी |
| ५ | गुन्हा दाखल दिनांक | दि. २/११/२०२१ रोजी १८:१० वा. |
| ६ | आरोपींची संख्या | ०१ |
| ७ | गुन्हयाचा हेतू | शारीरीक अत्याचार करण्याच्या हेतूने जिवे ठार मारणे. |
| ८ | थोडक्यात प्रेस नोट | खालील प्रमाणे |

दिनांक.०२/११/२०२१ रोजी १६.०५ वाजताचे पूर्वी अज्ञात इसमाने एका महिलेचे तोंड, गळा, व हातपाय पटटयाने घटट आवळून तिच्यावर शारिरीक अत्याचार करण्याच्या हेतूने तिचा खून केला म्हणून पंतनगर पोलीस ठाणे येथे खुनाचा गुन्हा नोंद करण्यांत आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन कक्ष ५ कार्यालयामार्फत चार पथके तयार करण्यात आली होती. सदर पथकाने गुन्हयाच्या घटनास्थळावरील गुन्हा करण्यापुर्वी व गुन्हा केल्यानंतर पळुन जातानाचे अस्पष्ट सी.सी.टी.व्ही फुटेज वरून आरोपी हा अंदाजे ३० ते ४० वर्षे वयोगटातील पुरूष असल्याचे समजले होते. त्यानुसार आरोपीची चालण्याची लकब, वेशभुषा, केसांची रचनेच्या आधारे घटनास्थळापासून जाणारे व येणारे सर्व रस्ते व लहान गल्ल्या मधील खाजगी दुकाने व आस्थापना येथील सी.सी.टि.व्ही फुटेजची बारकाईने पाहणी करून पाहीजे आरोपीचे स्पष्ट फोटो प्राप्त करण्यात आले. तसेच संशयीत आरोपी हा अनुक्रमे पंतनगर, घाटकोपर, कुर्ला, सायन, माटुंगा, ॲन्टॉपहील, जी.टी.बी नगर, किंग सर्कल, माहीम, बी.के.सी. या ठिकाणी फुटपाथवर बेवारस रित्या वावरत असल्याचे दिसून आले होते. त्याअनुषंगाने वर नमुद परिसरात दिवसा व रात्रौ सापळा लावण्यात आला होता

त्याचदरम्यान मुंबई शहर व नवीमुंबई येथील पोलीस ठाण्याचे अभिलेख तपासला असता **वाशी पोलीस ठाणे गु.र.क्र ४२९/१६ कलम ३०२, ५०४,५०६ भा.द.वि** या गुन्हयातील अटक आरोपी व नमुद फुटेजमधील संशयीत पाहीजे आरोपी हा एकच असल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने नमुद गुन्हयाची सदयस्थिती पाहीली असता आरोपीने त्या गुन्हयात देखील एका महीलेचा अत्याचार करून खुन केल्यामुळे सदर गुन्हयात दिनांक १८/११/२०१६ ते दिनांक ०७/१०/२०२१ रोजीपर्यंत तळोजा जेलमध्ये होता. व सदर आरोपी हा **दिनांक ७/१०/२०२१ रोजी तळोजा कारागृह येथून मुक्त** झाल्याचे समजले. वाशी येथील गुन्हयाची पार्श्वभुमी पाहता पाहीजे आरोपी पुर्वी नवी मुंबई येथे फुटपाथवर वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाल्याने नवी मुंबई परिसरात खांदेश्वर, मानसरोवर, खारघर, बेलापूर या परिसरात देखील दिवसा व रात्रौ आरोपीच्या शोधार्थ पाळत ठेवण्यात आली होती.

वर नमुद आरोपीचा प्राप्त करण्यात आलेला फोटोवरून मुंबई व नवीमुंबई परीसरात फुटपाथवर बेवारसरित्या राहणारे, कचरा वेचणारे इसम यांचेकडे कसुन चौकशी करण्यात आली. त्यावरून नमुद वर्णनाचा इसम मानखुर्द व बेलापुर परीसरात वरचेवर येत असल्याचे समजल्याने त्याठिकाणी सापळा लावण्यात आला.

त्याअनुशंगाने दिनांक १३/११/२०२१ रोजी सदरचा पाहीजे आरोपी हा मानखुर्द स्टेशन परीसरात दिसुन आल्याने त्यास पथकाने तात्काळ शिताफिने ताब्यात घेतले. सदर संशयीत आरोपीकडे केलेल्या चौकशीवरून त्याने पंतनगर पोलीस ठाणे गु.र.क्र ६७७/२१ कलम ३०२ भा.द.वि या गुन्हयात दि.२/११/२१ रोजी मध्यरात्री बिल्डींग नं ३८ व ३९ मधील मोकळी जागा, पंतनगर येथील महीलेच्या डोक्यात दगड टाकून तिचा खून केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पुढील कारवाईकरीता पंतनगर पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे..

सदरची कारवाई ही मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस.विरेश प्रभु सो, मा. पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण) श्री प्रकाश जाधव सो, मा. सपोआ श्री. नितीन अलकनुरे सो यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे प्रभारी पो.नि घनश्याम नायर, पो.नि. सदानंद येरेकर, स.पो.नि. सुशांत बंडगर, स.पो.नि. अर्चना पाटील, स.पो.नि संजय जगताप, स.पो.नि जयदिप जाधव, स.पो.नि अमोल माळी, पो.उ.नि. लक्ष्मण वडरे, स.पो.उनि न्यायनिर्गुणे, यादव, साळुंखे, पो.हवा. राणे, भुजबळ, निरभवणे, पैंगणकर, विचारे, मालुसरे, देसाई, पो.ना. सिंग, चिलप, तानाजी पाटील, कांबळे, पो.शि. काळे, मुलानी, प्रमोद पाटील, सावंत. यांनी पार पाडली आहे.